# प्रेस नोट दिनांक २१/०८/२०१७

## घरफोडी व चैन चोरी करणारे सराईत गुन्हेगार बंटी - बबली व त्यांचा साथीदार पुन्हा एकदा गुन्हे शाखा,युनिट-१, पुणे शहरच्या जाळ्यात

पुणे शहरात मागील काही दिवसात घरफोडी चोरीच्या गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेने वरीष्ठ अधिकाऱ्यांनी घरफोडी चोरीचे गुन्हयांना आळा घालण्यासाठी आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने गुंन्हे शाखा, युनिट-१, पुणे शहर यांनी घरफोडी चोरीतील सराईत गुन्हेगारांना पकडण्यासाठी तपास सुरू केला असता, पोलीस कर्मचारी गजानन सोनुने व अशोक माने यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत खबर मिळाली होती की, पुणे शहर भागात ठिक-ठिकाणी घरफोडी चोरी करणारे सराईत गुन्हेगार मोठया प्रमाणात घरफोडी चोरीचे गुन्हे करीत आहेत. व दिवसा घरफोडी चोरीतील सराईत गुन्हेगार आकाश हेमराज परदेशी हा येरवडा येथील साईबाबा मंदीराजवळ उभा असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली होती. सदर माहितीचा आशय श्री.नितीन भोसले पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना कळवुन, त्यांनी पुढील कारवाई करणेकामी योग्य ते मार्गदर्शन करुन कारवाई करणेबाबत आदेशीत केल्याने पोलीस अधिकारी व स्टाफ, यांचे मदतीने सापळा रचुन आरोपी नामे १) आकाश हेमराज परदेशी वय २५ वर्षे,रा.येरवडा, पुणे २) अनिल काशीनाथ लष्करे वय २८ वर्षे,रा.वडारवस्ती, विश्रांतवाडी,पुणे.३) उषा राम कांबळे वय २५ वर्षे,रा.येरवडा, पुणे यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास दिनेश पाटील पोलीस उप-निरीक्षक हे करीत आहेत.

**सदर आरोपींना विश्वासात घेवून त्यांचेकडे अधिक तपास करता आरोपी क्रं. १ व २ यांनी चैन चोरीचे ३ गुन्हे अंलकार, कोथरुड, वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये तसेच घरफोडीचे ०७ गुन्हे विमानतळ,विश्रांतवाडी,निगडी,विश्रांमबाग पोलीस स्टेशनच्या हद्दीत असे एकुण १० गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यांचे ताब्यातुन १६२ ग्रॅम सोन्याचे दागिणे, ५९० ग्रॅम चांदीच्या चिजवस्तु, १ एल.इ.डी.टि.व्ही., २१००/- रु रोख रक्कम, व गुन्हयात वापरलेली होंडा मोटार सायकल असा एकुण ५,८३,०२०/- रु.कि.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच अटक आरोपी यांचेकडुन आणखी गुन्हे उघड होणेची शक्यता आहे.**

उपरोक्त नमुद गुन्हेगार हे पुणे शहरातील रेकॉर्डवरील घरफोडी चोरी करणारे सराईत गुन्हेगार असुन आरोपी क्रं. १) आकाश हेमराज परदेशी याचेवर या अगोदर पुणे शहरामध्ये वेग-वेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये **एकुण २४ गुन्हे दाखल आहे.** आरोपी क्रं. २) अनिल काशीनाथ लष्करे याचेवर **एकुण ८ गुन्हे** तसेच उषा राम कांबळे **हिचेवर १६ गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले सो., सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.शि.गजानन सोनुने, पो.ना.अशोक माने, पो.हवा.प्रकाश लोखंडे, राजु पवार, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, कैलास गिरी, विजयसिंग वसावे, कर्मचारी प्रशांत गायकवाड, मोहन येलपले मेहबुब मोकाशी, रिजवान जिनेडी, उमेश काटे, सुभाष पिंगळे, सुरेंद्र आढाव, सुधाकर माने, तुषार खडके, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, इम्रान शेख, यांनी केली आहे.

